# वैविध्य, समानता आणि समावेशन धोरण

## उद्देश

संस्थेमध्ये आणि आम्ही ज्यांच्याशी भागीअदरी करतो अशा मोठ्या समुदायात वैविध्य, समानता आणि समावेशन यांच्या प्रचारासाठी वेदांता लिमिटेड ("वेदांता") वचनबद्ध आहे. आमच्या मंडळापासून सुरुवात करत सगळ्या पातळ्यांवर लैंगिक समानता साध्य करणे आमचे उद्दिष्टं आहे. विविधतेची उद्दिष्ट्ये साध्य करण्यावर ज्याचा परिणाम होतो त्या विविध पैलूंवर काम करताना हे विविधता धोरण आम्हाला महत्त्वाचे पथयोजना, मार्गदर्शन आणि अंतर भरुन काढण्यासाठी उपाययोजना यांची व्याख्या, धोरण, योजना आणि अंमलबजावणी करण्यास मदत करेल. हे धोरण अग्रेसर आहे आणि वेदांत समूहातील व्यवसायांसाठी विविधता आणि समावेशासाठी एक दृष्टीकोन निश्चित करते.

## व्याप्ती

हे विविधता, समान्ता आणि समावेशन धोरण मंडळासह सर्व वेदांता लिमिटेडचे कर्मचाऱ्यांना लागू होते आणि विविधता व समावेशनाप्रती असलेल्या वेदांताच्या व्यापक बांधिलकीसाठी निश्चित केलेल्या वेदांताच्या व्यवसाय आचारसंहिता आणि संबंधित धोरणांना प्रेरणा देते. आमच्या विविधता आणि समावेशनाशी संबंधिती आमच्या इतर पद्धती व प्रघात, उपक्रम आणि संतुलनाविषयी इतर तपशील कंपनीच्या वार्षिक अहवालात उद्धृत केला आहे.

## विविधता आणि समावेशन यांची आमची व्याख्या

कार्यस्थळी असलेली विविधता म्हणजे एखाद्या संस्थेतील लोकांमधील भिन्नता. एखादी संस्था म्हणजे आपल्या कामात विचार, व्यक्तिमत्व, अद्वितीय क्षमता आणि प्रतिभा यांच्यातील वैयक्तिक भिन्नता घेऊन येणाऱ्या लोकांचे सामूहिक प्रतिनिधित्व असते. प्रत्येक व्यक्ती अद्वितीय असते हा समजुतदारपणा असतो आणि आपल्या वैयक्तिक भिन्नतेला मान्यता असते जेणेकरुन आम्ही आम्ही राष्ट्रीयत्व, भूगोल, वांशिकता, लिंग, लैंगिक अभिमुखता, वय, शारीरिक क्षमता, कौटुंबिक स्थिती, धार्मिक श्रद्धा, दृष्टीकोन, अनुभव किंवा इतर विचारधारा यासह परंतु इतकेच मर्यादित नसलेल्या भिन्न लोकांना प्रवेश देतो तेव्हा प्रत्येक व्यक्तीला आपण महत्त्वाचे, आदरणीय, समाविष्ट आणि गुंतलेले आहोत असे वाटेल. सगळ्या स्वरुपातील विविधतेचे आम्ही जोरकसपणे प्रशंसा करीत असलो तरी लैंगिक समानता साध्य करणे आमचा प्राधान्यक्रम आहे.

वैविध्यपूर्ण कार्यबळ (कामगार) तयार करण्याचा एक भाग म्हणून, मंडळाच्या सदस्यत्वामध्ये विविध कौशल्ये, व्यावसायिक आणि उद्योग पार्श्वभूमी, भौगोलिक अनुभव आणि कौशल्य, लिंग, कार्यकाळ, राष्ट्रीयत्व, वांशिकता आणि वैविध्यपूर्ण विचारांचा समावेश असणे आवश्यक आहे. वैविध्यपूर्ण मंडळामध्ये वैयक्तिक सदस्यांची कौशल्ये, ज्ञान, उद्योग अनुभव, पार्श्वभूमी, वंश, लिंग आणि इतर गुणांमधील फरकांचा समावेश असेल आणि त्याचा चांगला उपयोग होईल. त्याची निर्णयक्षमता सुधारण्यासाठी आणि कंपनीच्या भागधारकांना फायदा होण्यासाठी यात अनेक विचार, अंतर्दृष्टी, दृष्टीकोन आणि मतांची व्यापक श्रेणी असेल.

याशिवाय, आमच्या कामगारांमधून आम्ही सेवा देत असलेल्या वैविध्यपूर्ण ग्राहक आणि समुदायांचे प्रतिबिंब उमटायला हेवे. जागतिक स्तरावरील कंपनी म्हणून आम्ही विस्तृत श्रेणीतील कायदे आणि नियम असलेल्या देशांमध्ये काम करतो. आम्ही कुठे काम करतो आहोत याला महत्त्व न देता आम्ही विविधतेचा, सगळ्यांच्या प्रतिभेचा आणि क्षमतेचा आदर करण्याची काळजी आम्ही घेतो. आमच्यासोबत काम करणाऱ्या वैविध्यपूर्ण श्रेणीतील लोकांच्या कौशल्याचा, अनुभव आणि बांधिलकीचा आम्हाला मोठा फायदा होतो.

विविधता ही जितकी जागतिक स्तरावर विविध समूहांमधील निष्पक्षता आणि सामाजिक समानतेबद्दल आहे तितकीच ती एक व्यावसायिक आवश्यकताही आहे. निरोगी विविधतेचे मिश्रण असलेल्या कंपन्यांना त्यांच्या उद्योगाच्या सरासरीपेक्षा जास्त आर्थिक परतावा मिळण्याची शक्यता असते. याव्यतिरिक्त, संशोधन दर्शविते की सर्वात व्यस्त व नियुक्ती असलेले कर्मचारी हे खुले, निष्पक्ष आणि वैविध्यपूर्ण वातावरणात काम करणारे आहेत.

## विविधता आणि समावेशन धोरणाची उद्दिष्टे आणि व्याप्ती

समूहाची धोरण उद्दिष्टे पुढे घेऊन जाण्यासाठी उच्च प्रतिभा असलेल्या व्यक्तींची भरती करणे, त्यांना टिकवून ठेवणे आणि त्यांना प्रोत्साहन व बढती देण्यासाठी वेदांता वचनबद्ध आहे.

- जागतिक स्तरावर नामांकित कंपन्या आणि संस्थांसह बेंचमार्क केलेल्या विविधता व समावेशन उपक्रमांच्या संदर्भात सर्वोत्तम पद्धती व प्रघात वापरणे;
- सर्व कर्मचारी आणि कंत्राटदारांना समानता आणि आदराचे वातावरण उपलब्ध करून देणे;
- लिंग, वय, अपंगत्व, वांशिकता, अलिंगिक प्रवृत्ती, कौटुंबिक स्थिती, राष्ट्रीयत्व, धार्मिक श्रद्धा आणि क्षमता या आधारवर कोणत्याही व्यक्तीबाबत भेदभाव न करणे.

Sensitivity: Internal (C3)

- सर्व लिंग, सामाजिक आणि निम्न-प्रतिनिधत्व असलेल्या गटांशी ओळख पटणाऱ्या लोकांना मान्यता देणे व त्यांचा आदर करणे;
- समानता कायदा 2010 सह आम्ही ज्या भूक्षेत्रात काम करतो तेथील सर्व संबंधित कायद्यांनुसार काम करणे
- मानधन, रोजगाराच्या अटी आणि शर्ती, पदोन्नती, प्रशिक्षण आणि विकासाच्या संधींसह इतर बाबींमध्ये निष्पक्षता सुनिश्चित करणे आणि बेकायदेशीर भेदभाव टाळणे;
- समूहाच्या क्रियाकलापांदरम्यान कर्मचारी, ग्राहक, पुरवठादार आणि इतर भागधारकांद्वारे केलेल्या छळ, गुंडगिरी किंवा बेकायदेशीर भेदभावाच्या तक्रारींना त्वरित आणि निष्पक्षपणे हाताळणे;
- निष्पक्षतेला प्रोत्साहन देण्यासाठी समूहाच्या रोजगार धोरणांचे आणि पद्धतींचे पुनरावलोकन करणे आणि लैंगिक समतोल साध्य करण्यासाठी लिंगभेद आणि अंतर्निहित अडथळे दूर करणे;
- कर्मचाऱ्यांच्या क्षमतेचा पूर्ण उपयोग करून घेण्यासाठी आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण आणि विकासाच्या समान संधी प्रदान करुन नेतृत्व क्षमता विकसित करणे आणि
- करिअरच्या प्रगतीसंदर्भात सगळ्या कर्मचाऱ्यांना समान संधी उपलब्ध करुन देणे

वेदांतला जाणीव आहे की विविधता आणि समावेशन तत्त्वे स्थापित करण्यास्तव वातावरण तयार करण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी सगळ्या समूहांमध्ये संतुलित आणि एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता असेल. याशिवाय, आमचा विविधता आणि समावेशन अजेंडा पुढे घेऊन जाण्यासाठी आम्हाला समुदाय, स्वयंसेवी संस्था, संघटना, सरकार आणि विशेष स्वार्स्य गटांमध्ये  काम करण्याची आवश्यकता असेल. या धोरणात वेदांता कंपनी समूहाच्या सर्व कर्मचारी, व्यवस्थापन आणि कंत्राटदारांचा समावेश आहे.

## <u>जबाबदारी व पुनरावलोकन</u>

प्रत्येक वेदांता बिझनेस या धोरणाची अंमलबजावणी करेल. धोरणाशी संबंधित कामगिरीसाठी बिझनेस लीडर्सना जबाबदार धरले जाईल आणि संबंधित व्यवसाय भागीदार व्यवस्थापन मानकांच्या संपूर्ण अंमलबजावणीसाठी व्यवस्थापक जबाबदार असतील. संपूर्ण संस्थेमध्ये चांगल्या पद्धती व प्रघात सामायिक करण्यासह व्यवसाय भागीदार अनुपालनाचे चालू व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी आम्ही नियतकालिक आधारावर कामगिरीचे मोजमाप करू आणि अहवाल देऊ.

नामांकन आणि मानधन समिती या धोरनाचे वार्षिक पुनरावलोकन करेल आणि आवश्यकतेनुसार मंडळाला योग्य सुधारणा करण्याची शिफारस करेल.

स्वाक्षरी: संचालक/ मुख्य कार्यकारी अधिकारी, वेदांता लिमिटेड

दिनांक: ऑगस्ट 04, 2023